N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पुणे ग्रामीण **P.S.(ठाणे):** बारामती शहर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0373 **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 09/09/2026 08:02

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 07/09/2026
**Date To ( दिनांक पर्यंत):** 08/09/2026
**Time From (वेळेपासून):** 18:43 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:02 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 09/09/2026 **Time (वेळ):** 07:27 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 006
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 09/09/2026 07:27 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 3 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** बारामती माळेगाव रोड लगत,पीडीसीसी बँकेजवळ,वेस्टर्न , होशिजाकी डीप फ्रिज,विक्री दुकानाचे समोर येथे
(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): संतोष बुधा पाटील पोलीस निरीक्षक

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1981

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे,बंडगार्डन,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे,बंडगार्डन,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9892753374

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | महेश अंकुश उगले पोलीस हवालदार2637 | | | 1. फ्लट नं4,बारामती तालुका पोलीस स्टेशन,विमलनाथ अपार्टमेंट सुतार चाळ, , विजयनगर, बारामती,पुणे वर्ग-3, बारामती,बारामती शहर,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):



Scanned with CamScanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रानिक सामान | संगणकाचे सुटे भाग | स्पाय कमेरा मध्ये इन्सर्ट केलेले मेमरीकार्ड, | 700.00 |
| 2 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रानिक सामान | संगणकाचे सुटे भाग | दि. 07/09/2026 व दि. 08/09/2026 रोजी व्हाईस रेकर्डींग करतेवेळी वापरलेले मेमरीकार्ड, | 600.00 |
| 3 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रानिक सामान | संगणकाचे सुटे भाग | निवेदन घेतेवेळी व लाच रक्कम हस्तगत करतेवेळी करण्यात आलेल्या व्हिडीओ चित्रीकरणासाठी वापरलेले मेमरीकार | 400.00 |
| 4 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रानिक सामान | मोबाईल फोन | आरोपींनी गुन्हा करतेवेळी वापरलेले मोबाईल फोन | 30,000.00 |
| 5 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | पंचनाम्या दरम्यान लाचेची रक्कम रु.5,00,000/ त्यामधील डमी नोटांसह | 500,000.00 |
| 6 | इतर | संकीर्ण/विविध | लाच रक्कम ठेवलेली पिशवी व पकिंगकरीता वापरण्यात आलेला वर्तमान पत्राचा कागद | 0.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**
531,700.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दि.09/09/2026

मी संतोष बुधा पाटील वय 45 वर्षे पद- पोलीस निरीक्षक, नेमणुक- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे मोबा.क्र. 9892753374.

आज रोजी बारामती शहर पोलीस ठाणे येथे समक्ष हजर राहून सरकारतर्फे कायदेशिर फिर्याद देतो की, दि. 07/09/2026 रोजी मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे कार्यालयात कार्यालयीन कामकाज करीत असताना आमचे वरिष्ठ पोलीस उपअधीक्षक (प्रशासन) श्री सतिश वाळके यांनी सुमारे 12.00 वाजता त्यांचे कक्षात बोलावून आंम्हाला कळविले की बारामती येथुन तक्रारदार नामे श्री. मनोज भोईटे रा. बारामती मो.नं.8007089928 , यांनी ला.प्र.विभागाचे संपर्क क्रमांकावर फोन करुन त्यांची एका लोकसेवकाविरोधात लाच मागणीची तक्रार असल्याचे सांगुन सदर तक्रारदार यांची आपण पंच व सापळा पथकासह बारामती येथे जावुन भेट घेवुन त्यांची तक्रार सदर ठिकाणी नोंद करुन तक्रारीची पडताळणी करुन पुढिल कारवाई करावी असे आदेश दिले. तसेच सदर कारवाईकामी सापळा पथकामध्ये पोशि 1966/प्रविण तावरे, पोशि 9175/ अश्विन कुमकर, व शासकीय वाहन इर्टीगा क्र एस एच 12 यु सी 4109 त्यावरील चालक पोशि 4337/ चंद्रकांत कदम असे मदतीस दिले. तसेच गोपनिय कारवाईकरीता यापुर्वीच जिल्हा परीषद पुणे कडील श्री. अरविंद ढवळे , कनिष्ठ सहाय्यक, बांधकाम विभाग, पुणे जि.प. व श्री. सुजितकुमार सोनटक्के, कनिष्ठ सहाय्यक, बांधकाम विभाग, पुणे जि.प. असे पंच उपलब्ध करुन दिले. सदर पंच व सापळा पथक आमचे समक्ष 13.30 वा. हजर झाले असता आम्ही पंचांना आमचा व सापळा पथकाचा परीचय



Scanned with CamScanner

करवुन देवुन त्यांची ओळख करून घेतली.
त्यानंतर मी दोन्ही पंचांना व सापळा पथकास तक्रारदार श्री. मनोज भोईटे , रा. बारामती यांची एका लोकसेवका विरोधात तक्रार असल्याने कारवाई होणेकरीता त्यांनी ला.प्र.वि.कार्यालयाचे संपर्क क्रमांकावर फोन करुन कळविले असुन सदर तक्रारदार हे राहत असलेले ठिकाण बारामती येथे जावुन सदर ठिकाणी त्यांना भेटुन त्यांची तक्रार ऐकुन पुढिल कायदेशिर कारवाई करणेबाबत मा. पोलीस उपअधिक्षक (प्रशासन), श्री. वाळके सो., ला.प्र.वि. पुणे यांचे तोंडी आदेश झाल्याचे सांगुन पंचाना सदर सापळा कारवाईत पंच म्हणुन त्यांची संमती विचारता त्यांनी पंच म्हणुन काम पाहणेस राजीखुशीन संमती दिल्याने संपुर्ण सापळा पथक, व पंचांना बारामती येथे जावुन करावयाचे कारवाईबाबत अवगत करुन देवुन त्यांना योग्य त्या सुचना देवुन सदर ठिकाणी कारवाई पंचनाम्याकरीता लागणारे सिलींग लेबलींगचे साहीत्य, व्हाईस रेकॉर्डर, सिलबंद मेमरीकार्ड, लॅपटॉप प्रिन्टर , कॅमेरा , डमी करन्सी, लाख, सिल, रिकामे लिफाफे, अँन्थ्रासीन पावडरची सिलबंद शिशी, अल्ट्राव्हायलेट बॅटरी, काळा कापड, इ.तसेच वरीष्ठांच्या सुचनेनुसार हिडन कॅमेरा लावलेला शर्ट , असे सोबत घेवुन चालक पोहवा/ कदम यांच्यासह शासकीय अर्टीगा वाहन क्रं. एमएच 12 युसी 4109 हिचेने 13.50 वा. ला.प्र.वि.कार्यालय येथुन सापळा पथक व पंचासह रवाना झालो. आम्ही सर्व पुणे सोलापुर हायवे मार्गे पाटसवरून पालखी महामार्गाने बारामतीकडे रवाना झाल्यावर वाटेत तक्रारदार श्री. मनोज भोईटे यांना संपर्क करुन भेटणेचे ठिकाण निश्चीत करता त्यांनी त्यांचे लोकेशन पाठविले व त्या लोकेशनवर या असे सांगितले. त्याप्रमाणे आम्ही सदर लोकेशननुसार बारामती शहरातील जळोची गावच्या दिशेने जाणाऱ्या बारामती अंतर्गत रस्त्यावरील मलगुंडे बाग येथे सुरक्षित ठीकाणी रस्त्यालगत सुमारे 16.05 वाजता पोहचलो. सदर ठिकाणी आमचे अगोदर तक्रारदार हे त्यांच्या रॉयल इनफील्ड क्र. एमएच 42 बीएक्स 8328 सह हजर होते. आम्ही शासकीय वाहन त्यांचेजवळ थांबवले. सदर तक्रारदार हे आमचे जवळ आलेवर त्यांना आम्ही शासकीय वाहनात बसवुन त्यांचा सापळा पथक व पंचासह परीचय करवुन देवुन त्यांचे नाव गाव पत्ता विचारता त्यांनी त्यांचे नाव मनोज बापुराव भोईटे, वय 35 वर्षे ,रा. देवळे पॅराडाईज, बी विंग, फ्लॅट नं. 38, बारामती, असे सांगीतले असता आम्ही त्यांना पंचासमक्ष तक्रार विचारता त्यांनी सांगीतले की, बारामती तालुका पोलीस ठाणेचे पोलीस श्री. महेश उगले यांनी अर्जदार व त्यांची पत्नी यांचे विरोधात समस्त ग्रामस्थ, नक्षत्र गार्डन बारामती यांनी त्यांची पत्नी चालवित असलेल्या झुंबा डान्स क्लासमधे चित्र विचीत्र गाणे वाजत असल्याने त्यावर कारवाई होण्याकरीता अर्ज केल्याचे सांगुन सदर कारवाईतुन वाचण्यासाठी 7,00,000/- रुपये लाचेची मागणी करुन त्यापैकी 1,00,000/- रुपये दिनांक 04/09/2026 रोजी व 1,00,000/- रुपये दिनांक 05/09/2026 रोजी स्विकारुन उर्वरीत 5,00,000/- रुपये मागणी करुन त्यापैकी 2,00,000/- रुपये दिनांक 07/09/2026 रोजी घेवुन येण्यास सांगीतले असल्याने सदर लोकसेवकाकडुन त्यांना लाच मागणी होत असल्याची तक्रार असल्याचे पंचासमक्ष कथन केल्याने सदर तक्रारीवरून करण्यात येणाऱ्या पुढील पडताळणी व सापळा कारवाई कामी पंच क्र.1 म्हणून श्री अरविंद ढवळे , पंच क्र. 2 म्हणून श्री. सुजितकुमार सोनटक्के, काम पाहतील असे सर्वानुमते ठरविण्यात आल्यावर आम्ही लागलीच त्यांना त्यांची सदर तोंडी तक्रार स्वहस्ताक्षरात लेखी लिहुन देणेस सांगुन पेन व कागद असे लिखाण साहीत्य उपलब्ध करुन देता त्यांनी आपले हस्ताक्षरात लेखी तक्रार लिहुन दिली ती खालील प्रमाणे
"मी वरीलप्रमाणे अर्जदार असुन वर नमुद पत्यावर माझी पत्नी वृषाली वय-35 वर्षे, व दोन मुली आध्या वय 13 वर्षे ज्ञानेश्वरी -10 वर्षे असे राहण्यास आहे.
माझ्या पत्नीचा नक्षत्र गार्डन समोर 4 प्राईड कॉम्प्लेक्स येथे आध्या फ्रिस्टाईल झुंबा क्लासेस या नावाने व्यवसाय आहे. दि.04/09/2026 रोजी सकाळी 09.00 वाजता माझ्या पत्नीचा मोबा.क्र.9146589823 वर मोबा.क्र. 9767672222 वरून कॉल आला वर समोरील व्यक्तीने ते बारामती तालुका पोलीस स्टेशन वरून पोलीस महेश उगले बोलत असून तुमच्या विरुध्द तक्रार अर्ज आला असून तुम्ही मला सायंकाळी 06.00 वाजता पोलीस स्टेशनमध्ये भेटा असे सांगितले. त्यानंतर लगेच महेश उगले यांनी माझा मोबा.क्र.8007089928 वर मला कॉल करून तसेच सांगितले.
त्यानुसार आम्ही दि.04/09/2026 रोजी सायंकाळी 06.15 वाजताचे सुमारास पोलीस स्टेशन मधे जावून त्यांना भेटलो. त्यांनी आमच्या विरोधात आलेला अर्ज वाचून दाखवून समस्त ग्रामस्थ नक्षत्र गार्डन, जळोची येथील नागरीकांनी माझी पत्नी हिचे झुंबा व डान्स क्लासमध्ये विचित्र गाणी लावून विचीत्र डान्स करतात त्यामुळे नागरिकांना त्रास होत आहे. त्यामुळे तुमच्या डान्स क्लासेसवरती कारवाई करावी लागेल. कारवाई झाल्यावरती तुमची बदनामी व मानसिक त्रास होवू शकतो अशी आम्हाला भीती घातली. त्यानंतर महेश उगले हे आमच्यासोबत आमच्या डान्स क्लास ठिकाणी आले. पाहणी केली व परत आम्ही सगळे पोलीस स्टेशनला गेलो.
पोलीस स्टेशनला गेल्यानंतर सुमारे रात्री 08.00 वाजता महेश उगले यांनी तुम्हाला या कारवाईतुन वाचायचे असल्यास रु. 7,00,000/- मला दयावे लागतील. तसेच नाही दिले तर तुमच्यावर कारवाई होईल व त्यामुळे



Scanned with CamScanner

पेपरामध्ये बातमी येवून तुमची बदनामी होईल असे सांगुन भीती घातली. त्यावेळी मी त्यांना पैसे नसल्याचे सांगितले असता त्यांनी मला टप्प्याटप्प्याने पैसे दे. असे सांगुन त्याच रात्री माझ्याकडून पोलीस स्टेशन बाहेर रु.1,00,000 /- घेतले. त्यानंतर दुसऱ्या दिवशी दि.05/09/2026 रोजी दुपारच्या सुमारास 02.00 वाजता बारामती भिगवण रोड वरील एक्सिस बँक समोर माझी चारचाकी गाडी एमएच 42 बीजे 2850 मध्ये बसून माझ्याकडून रु. 1,00,000/- घेतले व उर्वरित रक्कम सोमवारी पाच लाखांपैकी दोन लाख रुपये घेवून येण्यास सांगितले असून आज रोजी दि.07/09/2026 रोजी 01.10 वाजता मला त्यांचा मिस कॉल आला म्हणून मी त्यांना परत कॉल केला असता त्यांनी मला रु.2,00,000/- घेवून येण्यास सांगितले. तत्पुर्वी मला त्यांनला लाच देण्याची इच्छा नसल्याने मी अँटी करप्शन ब्युरो, पुणे येथे आज सकाळी 10.19 वाजता फोनद्वारे तक्रार केलेली आहे. पोलीस महेश उगले हे माझ्याकडे मागणी करत असलेली रक्कम कोणतीही शासकीय फी नसून लाच रक्कम असल्याची माझी खात्री आहे. त्यांच्याविरुध्द आपल्या विभागामार्फत कायदेशीर कारवाई होण्यास विनंती आहे. तसेच महेश उगले, मी व माझी पत्नी असे आमच्या यापुर्वीचे कोणतेही आर्थिक व्यवहार व पुर्व वैमनस्य नाही."

वैगेरे मजकुराची तक्रारदार यांनी त्यांची लेखी तक्रार लिहुन त्यावर दिनांकीत स्वाक्षरी करुन सादर केल्याने सदर तक्रार मी व दोन्ही पंचांनी वाचुन त्याप्रमाणे दोन्ही पंचांनी व मी तक्रारीवर सहया केल्या.

त्यानंतर तक्रारदार भोईटे यांना लोकसेवक पोलीस महेश उगले यांनी दि.07/09/2026 रोजी सायंकाळी 17.00 वाजताचे सुमारास बारामती तालुका पोलीस स्टेशन येथे भेटण्यास बोलाविले असल्याने त्यावेळी त्यांचे सोबत पंच क्र.1 श्री ढवळे यांना पाठवून लोकसेवक उगले यांची तक्रारदार भोईटे यांचेकडे लाचेची मागणी आहे अगर कसे? याबाबत पुढील पडताळणी कार्यवाही शासकीय वाहनातुन करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. यानंतर मी तक्रारदार, दोन्ही पंच यांना पडताळणी वेळी घ्यावयाच्या दक्षतेच्या सुचना देवुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालयाकडून करण्यात येणाऱ्या पडताळणी व सापळा कारवाईबाबत माहीती देवुन लोकसेवक व तक्रारदार यांचे भेटीच्या वेळी हो◌णारे संभाषण हे आमचेकडील सोनी कंपनीचे व्हाईस रेकॉर्डरव्दारे रेकॉर्डींग केले जाणार असलेबाबत त्यांना कळवुन व्हाईस रेकॉर्डरच्या कार्यपद्धतीची त्यांना माहीती दिली. यानंतर आमचेकडील ट्रॅपबॅग साहित्यामधून सोनी कंपनीचा व्हॉईस रेकॉर्डर काढून त्यामध्ये नवीन सिलबंद पाकिटामधील मेमरीकार्ड काढुन त्याचे पुढील बाजुस M ROCK 16GB Micro SD HC I 10C व मागील बाजुस MR-K CE MMC16GB7THL-A15 TM 3280 2606 MADE IN TAIWAN असे छापलेले होते ते पंचांना दाखवुन व्हॉईस रेकॉर्डमध्ये घालुन सदर रेकॉर्डर पोशि तावरे यांचेकडे दिला. यानंतर पडताळणी निवेदने ध्वनिमुद्रीत करतेवेळी त्याचे व्हिडीओ चित्रिकरण करण्यात येणार असल्याने मी ट्रॅपबॅगमधील सोनी कंपनीचा व्हिडीओ रेकॉर्डर काढून त्याची माहीती पंचांना देवुन त्यामध्ये नवीन सिलंबद पाकिटामधील मेमरीकार्ड त्याचे पुढील बाजुस SanDisk 8GB Micro SD HC I 4C 52010NAZN13Q BH MADE IN TAIWAN व मागील बाजूस MCP-XY05/26 CE MMC04B8T2D-TO JC XAH 2605 MADE IN TAIWAN असे छापलेले होते ते पंचांना दाखवुन व्हिडीओ रेकॉर्डमध्ये घालुन सदर व्हिडीओ रेकॉर्डर पोशि कुमकर यांचेकडे दिला. यानंतर तक्रारदार हे लोकसेवक उगले यांना भेटण्याकरीता जाण्यापासून ते परत येईपर्यतच्या पुर्ण घटनेचे व्हिडीओ चित्रिकरण करण्यात येणार असल्याचे सांगुन आंम्ही दिलेल्या सुचनेनुसार पोशि कुमकर यांनी स्पाय कॅमेरा असलेला विटकरी काळ्या रंगाचा चौखडा शर्ट साहित्यामधून काढून त्याचे डिव्हॉईसमध्ये नवीन सिलबंद पाकिटातील एम रॉक कंपीनीचे 32 जीबी क्षमतेचे मेमरीकार्ड घातले. त्याचे पुढील बाजूस M ROCK 32GB Micro SD HC I 10C व मागील बाजूस A2318 MI230400118 MR-XY07/26 असे छापलेले होते. त्यानंतर सदर शर्ट तक्रारदार यांना परिधान करण्यास दिला असता तक्रारदार भोईटे यांनी तो परिधान केला.

त्यानंतर माझे सुचनेवरून पोशि तावरे यांनी 18.28 वाजता व्हॉईस रेकॉर्डर चालू करून त्यामध्ये प्रथम तक्रारदार श्री भोईटे व त्यानंतर पंच क्रं 1 श्री. ढवळे व पंच क्र. 2 श्री सोनटक्के यांची पडताळणी कारवाई करीताची निवेदने व्हाईस रेकॉर्डरद्वारे त्यामधील मेमरीकार्डमध्ये ध्वनीमुद्रीत केली व व्हॉईस रेकॉर्डर 18.33 वा. बंद केला. सदरवेळी पोशि कुमकर यांनी त्यांचेकडील व्हिडीओ रेकॉर्डरद्वारे चित्रिकरण केले.

यानंतर आंम्ही पुनश्च तक्रारदार व पंच यांना पडताळणी वेळी घ्यावयाच्या दक्षतेच्या सविस्तर सुचना देवुन पोशि तावरे यांना व्हाईस रेकॉर्डर सुरु करण्याची सुचना दिली असता पोशि तावरे यांनी त्यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर 18.43 वाजता चालू करून तो तक्रारदार भोईटे यांनी परिधान केलेल्या शर्टचे आतील बाजून बनियानला सेफ्टी पिनचे सहाय्याने लावला. त्याचवेळी पोशि कुमकर यांनी तक्रारदार यांनी परिधान केलेल्या शर्टच्या स्पाय कॅमेऱ्याचे बटन सुरु केले व त्यांचेकडील मोबाईलमध्ये तो सुरु झाल्याची खात्री केली. त्यानंतर तक्रारदार भोईटे हे त्यांचेकडील दुचाकी वाहन रॉयल इनफील्ड क्र.एमएच 42 बीएक्स 8328 ने पंच क्र.1 श्री. ढवळे यांचेसोबत लोकसेवक पोलीस उगले यांची भेट घेण्याकरीता बारामती तालुका पोलीस स्टेशनच्या दिशेने त्याचवेळी रवाना झाले.



Scanned with CamScanner

मी उर्वरित पथक व पंच क्र.2 यांचेसह शासकीय वाहनात सदर ठिकाणी थांबून राहिलो. सुमारे 1 तासाने पंच क्रं. 1 व तक्रारदार सापळा पथकाजवळ परत आले तेव्हा आमचे सुचने वरुन पोशि तावरे यांनी तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन बंद केला तेव्हा 19.46 वाजले होते. त्यावेळी मी पंच क्र.1 यांना पडताळणी कारवाई दरम्यान घडलेल्या हकिकतेबाबत विचारणा केली असता त्यांनी पंच क्र.2 यांचे समक्ष सांगितले की, "मी व तक्रारदार असे तक्रारदार यांचे दुचाकीने बारामती तालुका पोलीस स्टेशन येथे गेले. पोलीस स्टेशन आवारामध्ये बाहेर एका गुन्हेगारावर अग्रिशस्त्राबाबत कारवाई झाल्याने त्याचे प्रेसनोट करीताचे फोटोसेशन चालू होते. त्यामध्ये मधोमध चष्मा परिधान केलेला व मजबुत शरीरयष्टीचा उभा असलेल्या इसमाकडे इशारा करुन तोच पोलीस उगले असल्याचे तक्रारदार भोईटे यांनी मला दाखवले. त्यानंतर पोलीस उगले हे पोलीस ठाणे इमारती आतमध्ये गेले. थोडयाच वेळात आम्ही देखील त्यांचे पाठोपाठ आतमध्ये गेलो. पोर्चमधून आत गेल्यानंतर उजव्या बाजूस असलेल्या खोलीमध्ये पोलीस उगले बसले होते. तक्रारदार यांनी त्यांना हात दाखवला असता पोलीस उगले आमच्या जवळ आले. त्यानंतर पोलीस उगले यांनी तक्रारदार यांना अंगठा आणी पहील्या बोटाने पैसे मागीतल्याचा इशारा करुन पैश्याबाबत विचारणा केली असता तक्रारदार यांनी होकारार्थी मान हलवली असता उगले यांनी "ठिक आहे बाहेर थांबा पाच मिनिटामध्ये आलो" असे सांगितले. त्यानंतर आम्ही दोघे बाहेर येवून पोर्चच्या उजव्या बाजुस असलेल्या पार्किंगमध्ये थांबलो. त्यानंतर सुमारे दहा मिनिटांनी महेश उगले बाहेर येवून आम्ही थांबलेल्या ठिकाणी आले. त्यावेळी तक्रारदार व महेश उगले याचेत तक्रारदार व त्यांचे पत्नीचे डान्स क्लास विरुध्द असलेल्या तक्रार अर्जाचे अनुषंगाने चर्चा झाली. सदर वेळी तक्रारदार यांनी उगले यांना "मी म्हटलं त्यांना की आज जे अमाउंट तुम्हाला ना सात लाख रुपये दोन लाख रुपये दिलेत तर आता पाच च अरेंजमेंट केल सगळंच काय असेल ते म्हणले वाईस रिक्वेस्ट म्हटल तुम्ही बोला म्हणल एकदा" अशी विंनती केली असता श्री. उगले यांनी तक्रारदार यांना "ते पुढं सांगितलेल आहे सगळ्या गोष्टी आता लग्न झाल्यावर परत म्हणायचं हुंडा किती मागायचान काय मागायचान" असे म्हणुन पैसे कमी करण्यास नकार दिला. यानंतर अर्जात कारवाई झाल्यास पेपरात नाव छापुन येईल त्याने समाजात मोठी बदनामी होईल तसेच मुलांना शाळेत देखील बाकीचे मुले विचारतील त्यामुळे तुंम्हाला त्रास होईल तसेच कोणी झुंबा करतांना हार्ट अटॅकने मेले तर तुमच्यावर मर्डरची केस लागेल, अशी भिती घातली. यानंतर तक्रारदार भोईटे यांनी "आलो◌ं म्हणल घेऊन पैसे" असे बोलता लोकसेवक यांनी या की, असे बोलले त्यावर तक्रारदाराने "सगळेच अमाऊंट देतो पाचच्या पाच लाख" असे बोलता लोकसेवक उगले यांनी "ते करावच लागल ते आताच विचारणा झालेली मला, ते काय असतं आमच्यात बी साखळी पद्धते" कॉल करा मग असे बोलुन पैसे घेवुन येण्यास सांगीतले वैगेरे मजकुराचे संभाषण करुन पुर्वी घेतलेले 2 लाख घेतल्याचे कबुल करुन उर्वरीत 5 लाख पुर्ण आजच फोन करुन आणुन देण्यास सांगीतले. यानंतर तक्रारदार व मी आपण थांबुन असलेल्या ठिकाणी परत आलो आहोत. असे सांगीतले असता तक्रारदारास सदर बाबत विचारणा करता त्यांनी देखील पंच क्रं. 1 यांच्या सांगण्याप्रमाणे मजकुराची हकिकत सांगुन पंचांच्या सांगण्याला दुजोरा दिला. त्यानंतर मी दोन्ही पंचासमक्ष व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरीकार्डमध्ये पडताळणी कारवाई दरम्यान ध्वनिमुद्रीत संभाषणाची फाईल फास्ट रिव्हर्स-फॉरवर्ड करुन ऐकुन तक्रारदार व पंच क्र. 1 यांनी सांगितलेली हकिकत बरोबर असल्याची खात्री केली.

झालेल्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक श्री. उगले यांनी तक्रारदार व त्यांची पत्नी यांचे विरोधात आलेल्या अर्जावर कारवाई झाल्यास त्यांची बदनामी होईल किंवा मर्डर सारखा गुन्हा दाखल होईल यामुळे त्यांना भयंकर त्रास होईल अशी भिती घालुन पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक उगले यांनी तक्रारदार यांना उर्वरित रु.5,00,000/- फोन करून घेवून येण्यास सांगितल्याने पुढील सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानुसार तक्रारदार यांना लाच रकमेकरीता वापरण्यात येणाऱ्या रकमेबाबत विचारणा केली असता तक्रारदार श्री भोईटे यांनी त्यांचेकडे लाच रकमेकरीता सध्या कोणतीही रक्कम उपलब्ध नसल्याचे सांगुन उदया रोजी तजविज करतो असे सांगितले. त्यामुळे आज रोजीची पडताळणी कारवाई स्थगित करून उदया दि.08/09/2026 रोजी सापळा कारवाई आजमाविण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. सदरची चर्चा सुरु असतांना लोकसेवक उगले यांचे मोबा.क्र. 9767672222 वरून तक्रारदार यांचा मोबा.क्र.8007089928 यावर 21.22 वा. साधा मिस कॉल येवून गेला. सदर वेळी तक्रारदार यांना लोकसेवकास फोन करणेस सांगीतले असता त्यांनी सांगीतले की लोकसेवक उगले हे नार्मल कॉल केल्यास ते कॉल रेकॉर्डींगच्या भितीने कोडवर्ड मधे बोलतात. परंतु सदर कॉलवरील संभाषण ध्वनिमुद्रीत करणे आवश्यक असल्याने 21.25 वाजता तक्रारदार यांचा मोबाईलचा स्पिकर ऑन करुन लोकसेवक यांना साधा कॉल केला असता लोकसेवक महेश उगले यांनी तक्रारदार यांना कधी येताय अशी विचारणा केली असता तक्रारदार यांनी त्यांचे मुलीची तब्येत ठिक नसल्याचे कारण देवून रकमेची जुळवा जुळव झाली नसल्याचे सांगितले. त्यावर लोकसेवक उगले यांनी रेल्वे स्टेशन जवळ भेटण्यासाठी या असे तक्रारदार यांना सांगितले. रात्रीची वेळ असल्याने तक्रारदार यांनी लोकसेवक यांना भेटण्यास न जाणेबाबत मत व्यक्त करुन लोकसेवक यांचा व्हाटसप



Scanned with CamScanner

कॉल आल्यास ते मोकळेपणाने बोलतील असे सांगीतल्याने पुनश्च लोकसेवक यांचा कॉल येण्याची वाट पाहत थांबुन राहीलो. सुमारे 21.51 च्या सुमारास पुन्हा तक्रारदार यांना त्यांच्या मोबाईल नंबरवर लोकसेवक श्री. उगले यांचा त्याचा मोबाईल नंबर 9767672222 यावरुन नार्मल कॉल आला. सदरवेळी कॉल देखील ध्वनिमुद्रीत करावयाचा असल्याने तक्रारदार यांनी तो उचलला नाही. लोकसेवक हे व्हॉटसपवरच बोलत असल्याने तक्रारदार यांनी लोकसेवकास व्हॉटसपवर Hi असा मेसेज केल्यावर काहीवेळाने लोकसेवक उगले यांनी तक्रारदार यांना त्यांचे व्हॉटसप मोबा.क्र.9834512403 वर स्वताचा व्हाटसप नंबर 9767672222 यावरुन Hi असा व्हॉटसप मॅसेज केला. त्यानंतर लागलीच आम्ही दिलेल्या सुचनेवरून पोशि तावरे यांनी 21.59 वा. व्हॉईस रेकॉर्डर चालू करून तो तक्रारदार यांचेसमोर धरला. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांचे व्हॉटसप मोबा.क्र.9834512403 लोकसेवक उगले यांचे व्हाटसप नंबर 9767672222 शासकीय वाहनामध्ये बसून 21.59 वाजता हॉटसप कॉल करून फोनचा स्पीकर ऑन केला असता संपर्क झाला त्यावेळी महेश उगले व तक्रारदार यांचे झालेल्या संभाषणा दरम्यान श्री. उगले यांनी "थांबलेलो होतो ना काय किती वेळ लागंल" असे विचारता तक्रारदाराने "काय झालं मोठ्या पोरीला उलट्या जुलाबा होतात नाही का त्याच्यामुळे म्हटलं मग काय उद्या वगैरे भेटायचं का कसं करायचं मग" असे सांगीतले असता लोकसेवक उगले यांनी "काय गणितच कळंना नाही का भोईटे साहेब काय" असे बोलले त्यावर तक्रारदार भोइटे यांनी "ते 30- 40,000 आहेत मग बाकीचं उद्या काय जेवढं जुळतील तेवढं उद्या सकाळी दिलं असतं तुम्ही म्हणाल त्यावेळेस" असे बोलुन पैसे बाबत बोलणे करता "सगळंच आपलं बोलणं झालं ना आज करतो म्हणुन" असे लोकसेवक बोलुन आजच पैसे मागत असल्याचे निष्पन्न झाले. यानंतर "सकाळीच क्लिअर करा की साहेब दहाच्या आतमध्ये नाही का, दहा- अकरा वाजता बँकेच्या टायमिंग प्रमाणे" असे बोलुन दुस-या दिवशी सकाळी पैसे आणुन देण्याची मागणी केली. यावर तक्रारदारने "किती क्लिअर करू उद्या मग" असे विचारता लोकसेवक उगले यांनी "नाही सगळचं कराव लागलं साहेब" असे बोलले त्यावर तक्रारदाराने तडजोड करता "दोन एक लाखा लाखापर्यंत लाख दोन लाख रुपये करु का सकाळी" अशी विंनती करता लोकसेवक उगले यांनी "नाय नाय नाय नाय साहेब सगळंच क्लिअर करावं लागंल, मला पण पुढे विचारणारे लोकयेत नाही का..मग कराव लागलं तुम्हाला" "नाय नाय सगळचं करा उद्या राहीलेलं, पहिले दोन दिलेत पाच राहीलेत, तेवढंच करा सगळ" "नाय नाय सगळचं करा मी काय म्हणातोय साहेब तुम्हाला सगळचं करा उद्या" असे पंचासमक्ष व्हॉटसपवर बोलुन आधी घेतलेले 2 लाख व उर्वरीत 5 लाख मागणी केल्याचे सुस्पष्ट झाले.

एकंदरीत लोकसेवक पोलीस उगले यांनी तक्रारदार व त्यांचे पत्नीचे डान्स क्लास विरुध्द बारामती तालुका पोलीस स्टेशन येथे दाखल असलेल्या तक्रार अर्जामध्ये तक्रारदार व त्यांची पत्नी यांचेविरुध्द कारवाई न करण्यासाठी रु. 7,00,000/- मागणी केल्याचे व त्यापैकी रु.2,00,000/- स्वीकारल्याचे मान्य करून आजरोजी पडताळणीमधे उर्वरित रु.5,00,000/-ची मागणी करून ते उदया दि.08/09/2026 रोजी सकाळी बँक सुरू होण्याचे वेळी दहा - अकरा वाजता पर्यंत पोलीस ठाण्यात घेवून येण्यास सांगितल्याचे पंचासमक्ष निष्पन्न झाले. त्यावरुन दि. 08/09/2026 रोजी सापळा कारवाई करण्याचे ठरवून आज दि.07/09/2026 रोजीची पडताळणी कारवाई स्थगित करण्यात आली. त्यानंतर सदर ठिकाणी पुढील कामकाज करणे सोईचे नसल्याने पुढील कामकाज लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे कार्यालयामध्ये जावून करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. सदरवेळी तक्रारदारास गोपनियतेच्या सुचना देवुन मागणी केलेली लाच रक्कम 5,00,000/- सोबत आणण्याची सुचना देवुन दुसरे दिवशी भेटण्याचे ठिकाण याच जागी सर्वानुमते निश्चित करुन तक्रारदारास दि.08/09/2026 रोजी सकाळी 10.45 वा. च्या सुमारास लाच रककम सोबत घेवुन येण्याची सुचना देवुन त्यांचे निवास्थानी रवाना करुन आंम्ही पंच व सापळा पथकासह शासकीय वाहनाने सदर ठिकाणवरून 21.20 वाचे सुमारास रवाना होवून सुमारे 00.50 वा चे सुमारास ला.प्र.वि. पुणे कार्यालयात पोहोचुन सदर ठिकाणी व्हाईस रेकॉर्डर मधिल ध्वनीमुद्रीत झालेले संभाषणाची स्क्रिप्ट पंच क्रं. 1 यांचे साहाय्याने पोशि कुमकर यांचे मदतीने काढणेत येवुन पंचनाम्याची उर्वरीत कार्यवाही पुर्ण केली. सदर बाबत सविस्तर पंचनामा दिनांक 07/09/2026 रोजीचे 13.55 वाजता सुरू करून दि. 08/09/2026 रोजीचे 02.00 वाजता दरम्यान पुर्ण करणेत आला आहे. यानंतर आंम्ही पंच व सापळा पथकास सकाळी 07.45 वा. ला.प्र.वि.पुणे कार्यालय येथे हजर राहण्यास सांगुन गोपनियतेच्या सुचना दिल्या.

तदनंतर पडताळणी पंचनाम्या दरम्यान दिलेल्या सुचनेप्रमाणे दोन्ही पंच व सापळा पथक असे दिनांक 08/09/2026 रोजी 07.45 वा. ला.प्र.वि.कार्यलिय पुणे येथे हजर आल्यावर पंचांना व सापळा पथकास पुनश्च एकमेकांचा परीचय देवुन त्यांना पडताळणी पंचनाम्याची उजळणी करुन देवुन आंम्ही , पंच व सापळा पथक असे शासकिय ईर्टीगा वाहन क्रं. एमएच 12 युसी 4109 हिचेने दिनांक 08/09/2026 रोजी 08.00 वा. चालक पोहवा कदम यांचेसह पंचनाम्याचे व सिलीगं लेबलींगचे साहीत्य, अँथ्रासीन पावडरची सिलबंद शिशी, अल्ट्राव्हायलेट बॅटरी, लाख, सिल , डमी करन्सी , लॅपटॉप, प्रिन्टर, केबल, कार्ड रिडर, पडताळणी पंचनाम्यात वापरण्यात आलेले



Scanned with CamScanner

व सिलबंद केलेले मेमरी कार्डचे सिलबंद पाकीटे इ. सह रिकामे लिफाफे, गोंद व आवश्यक इतर स्टेशनरी साहीत्यासह रवाना झालो. आम्ही सर्व पुणे सोलापुर हायवे मार्गे पाटसवरून पालखी महामार्गाने बारामतीकडे रवाना होवुन 10.45 वा. नियोजित ठिकाण बारामती शहरातील जळोची गावच्या दिशेने जाणाऱ्या अंतर्गत रस्त्यावरील मलगुंडे बाग येथे रस्त्यालगत पोहोचलो. सदर ठिकाणी पोहोचल्यावर तक्रारदार फोन करुन विचारणा करता त्यांनी ते लाच रक्कमेची जुळवाजुळव करत असुन काहीवेळात पोहोचत असल्याचे सांगीतले असता तक्रारदार हे 11.25 वा. त्यांचे ताब्यातील ह्युंडाई ऑरा कार नं. एमएच 42 बी जे 2850 हिचेने नियोजित ठिकाणी पोहोचले. तक्रारदार श्री. भोईटे हे आल्यावर त्यांना पुनश्च सापळा पथक, पंच यांचा परीचय एकमेकांसोबत करवुन देवुन पडताळणी पंचनाम्या दरम्यान झालेल्या कारवाईची उजळणी करुन दिली. यानंतर तक्रारदार यांना 08/09/2026 रोजी लोकसेवकाने लाच रक्कम घेवुन बोलावले असल्याने 08/09/2026 रोजी करावयाचे सापळा कारवाईबाबत अवगत करवुन देवुन तक्रारदारास लाच रक्कम हजर करण्यास सांगीतले असता त्यांनी त्यांचेकडील 2,00,000/- रुपये रक्कम हजर करुन उर्वरीत लाच रक्कम 3,00,000/- जमा होवु शकली नसल्याचे सांगीतल्याने उर्वरीत 3,00,000/- रुपये रक्कमे ऐवजी खेळण्यातल्या डमी नोटा वापरायचे सर्वानुमते ठरले. त्यानंतर मी दिलेल्या सुचनेप्रमाणे चालक पोहवा कदम यांनी शासकीय वाहनामध्ये तक्रारदार व दोन्ही पंचांना अँथ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे गुणधर्म समजावून सांगितले की, अँथ्रासिन पावडर नेहमीच्या प्रकाशामध्ये पाहीली असता तिचेवर कोणतीही चकाकी दिसून येत नाही परंतु अंधारामध्ये तिचेवर अल्ट्राव्हायोलेट दिव्याचा प्रकाश टाकला असता तिचेवर फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसून येते. पोहवा कदम यांनी त्याबाबतची प्रात्यक्षिके करून दाखविली. त्यानंतर तक्रारदार यांनी हजर केलेल्या लाच रक्कमेच्या खऱ्या नोटांचे क्रमांक पंच क्रं. 1 व 2 यांचे मदतीने लिहुन घेवुन सदर 2,00,000/- खऱ्या नोटा व 3,00,000/- रकमेच्या खेळण्यातील डमी नोटांना पोहवा कदम यांनी अँथ्रासिन पावडर लावली. उर्वरीत पावडर शिशीमधे ठेवुन सदर शिशी सिलबंद करुन त्यावर आमचे व पंचांचे सहीचे लेबल लावुन सिलबंद केले. यानंतर सर्व रक्कम एकत्र पॅक करून लोकसेवकास संशय येवू नये म्हणून पॅक केलेले नोटांचे बंडल वर्तमान पत्राचे कागदामध्ये रबराचे सहाय्याने पॅक केले. त्यावर देखील अँथ्रासिन पावडर लावली. त्यानंतर सदर पॅक केलेल्या नोटा एका बाजुस निळया काळ्या रंगाचे पट्टे व दुसऱ्या बाजुस भगवा रंग असलेली चैनची कापडी टिफीन बॅगमधे ठेवल्या व सदर पिशवीस व तिचे हॅन्डल व चैनला अँथ्रासिन पावडर लावली. यानंतर सदर रक्कम असलेली पिशवी पोहवा/कदम यांचे ताब्यात ठेवण्याच्या आम्ही सुचना देवुन तक्रारदार यांना सापळा कारवाईमधे एक दुचाकी वाहनाची आवश्यकता भासण्याची शक्यता असल्याने एक दुचाकी उपलब्ध करुन देण्याची विंनती करता त्यांनी पोशि कुमकर यांना आपले चारचाकी वाहनाने सोबत घेवुन जावुन काही वेळाने मोटारसायकल क्रं. एमएच 11 सीसी 2699 हि पोशि कुमकर यांच्या ताब्यात देवुन स्वता चारचाकी वाहनाने नियोजित पथक थांबलेल्या ठिकाणी दोघेही आले. यानंतर सापळा कारवाई करीता पडताळणी पंचनाम्या दरम्यान वापरण्यात आलेले व्हाईस रेकॉर्डरमधील सिलबंद करणेत आलेले मेमरी कार्ड असलेला कागदी सिलबंद लिफाफा , निवेदनाचे व्हिडीओ रेकॉर्डींग असलेल्या मेमरीकार्डचा लिफाफा तसेच स्पाय कॅमेरा व्हिडीओ रेकॉर्डींग असलेला सिलबंद कागदी लिफाफा पंचांसमक्ष ट्रॅपबॅगमधुन काढुन सदर सिलबंद लिफाफे फाडुन त्यापैकी पडताळणी पंचनाम्यातील व्हाईस रेकॉर्डींग असलेले मेमरी कार्ड त्याच्या पुढील बाजुस M ROCK 16GB Micro SD HC I 10C व मागील बाजुस MR-K CE MMC16GB7THL-A15 TM 3280 2606 MADE IN TAIWAN असे छापलेले होते ते व्हॉईस रेकॉर्डमध्ये घालुन सदर रेकॉर्डर पोशि तावरे यांचेकडे दिला. यानंतर पडताळणी निवेदने ध्वनिमुद्रीत करतेवेळी त्याचे व्हिडीओ चित्रिकरण करण्यात येणार असल्याने सोनी कंपनीचा व्हिडीओ रेकॉर्डर काढून त्यामध्ये पुर्वीचे पडताळणी पंचनाम्यातील निवेदन व्हिडीओ रेकॉर्डींग असलेले मेमरी कार्ड त्याच्या पुढील बाजुस मेमरीकार्ड त्याचे पुढील बाजुस SanDisk 8GB Micro SD HC I 4C 52010NAZN13Q BH MADE IN TAIWAN व मागील बाजूस MCP-XY05/26 CE MMC04B8T2D-TO JC XAH 2605 MADE IN TAIWAN असे छापलेले होते ते पंचांना दाखवुन व्हिडीओ रेकॉर्डमध्ये घालुन सदर व्हिडीओ रेकॉर्डर पोशि कुमकर यांचेकडे दिला. यानंतर तक्रारदार हे लोकसेवक उगले यांना लाच रक्कम देणेकरीता भेटघेण्याकरीता जाण्यापासून सापळा कारवाई पुर्ण होई पर्यंतच्या पुर्ण घटनेचे व्हिडीओ चित्रिकरण करण्यात येणार असल्याचे सांगुन आम्ही दिलेल्या सुचनेनुसार पोशि कुमकर यांनी स्पाय कॅमेरा असलेला विटकरी काळ्या रंगाचा चौखडा शर्ट साहित्यामधून काढून त्याचे डिव्हॉईसमध्ये यापुर्वीचे पडताळणी पंचनाम्यावेळी स्पाय कॅमेरात वापरलेले व सदरचे व्हिडीओ रेकॅर्डीग असलेले एम रॉक कंपीनीचे 32 जीबी क्षमतेचे मेमरीकार्ड घातले. त्याचे पुढील बाजूस M ROCK 32GB Micro SD HC I 10C व मागील बाजूस A2318 MI230400118 MR-XY07/26 असे छापलेले होते. त्यानंतर सदर शर्ट तक्रारदार यांना परिधान करण्यास दिला असता तक्रारदार भोईटे यांनी तो परिधान केला. यानंतर पोशि तावरे यांना व्हाईस रेकॉडींग तसेच पोशि कुमकर यांना व्हिडीओ कॅमेरा सुरु करण्याच्या सुचना देवुन निवेदनाचे व्हाईस रेकॉडींग वेळ 12.31 ते

12.38 दरम्यान करुन व्हाईस रेकॉर्डर बंद केला. यानंतर तक्रारदार व पंच क्रं. 1 यांना सापळा कारवाईच्या सविस्तर सुचना देवुन आमचे सुचनेवरुन चा.पोहवा कदम यांनी त्यांच्या ताब्यात ठेवलेली लाच रक्कम असलेली नमुद प्रमाणे वर्णनाची कापडी टिफीन बॅग पिशवी तक्रारदार यांची हुडाई कार नंबर एमएच 42 बी जे 2850 हिचे डिक्कीत ठेवली. यानंतर पोहवा कदम यांनी लागलीच पाण्याने हात स्वच्छ धुवुन येण्याची सुचना दिली असता ते आपले हात पाण्याने धुवुन आले. त्यांना सापळा पथकातुन वगळण्यात आले. यानंतर तक्रारदार यांना लोकसेवकाने मागणी केल्यावरच त्यांच्या कारच्या डिक्कीत लाच रक्कम असलेली नमुद वर्णनाची कापडी टिफीन बॅग द्यावी व सदर लाच रक्कम दिल्याचा इशारा म्हणुन त्यांच्या शर्टाच्या खिशातील रेबॅनचा काळा गॉगल डोळ्यांना लावुन लाच स्विकारणीचा इशारा द्यावा. यानंतर पुन्हा तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकास सापळा कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. सापळा कारवाई दरम्यान आंम्ही व पंच क्रं. 2 असे तक्रारदाराने आणलेल्या मोटारसायकल नंबर एमएच 11 सीसी 2699 हि पंच क्रं.2 यांना चालवण्यास देवुन आंम्ही त्यांचे पाठीमागे बसुन बाकी उर्वरीत पथक शासकीय वाहनाने येतील असे सर्वानुमते ठरवण्यात आले.
त्यानंतर मी दिलेल्या सुचनेप्रमाणे पोशि तावरे यांनी व्हॉईस रेकॉर्डर 12.56 वाजता चालू करून तक्रारदार यांनी परिधान केलेल्या शर्टचे आतील बनियान कोणासही संशय येणार नाही अशा रितीने लावला. तसेच पोशि कुमकर यांनी तक्रारदाराचे शर्टास लावलेला स्पाय कॅमेरा ऑन करुन आंम्ही सापळा पथक त्याचवेळी पोलीस ठाणे बारामती तालुका येथे त्याचवेळी रवाना होवुन बारामती पोलीस ठाणे येथे पोहोचुन काही अंतरावर आमचेकडील दुचाकी पार्क करुन इतर सापळा पथक शासकीय वाहनातुन उतरुन बारामती पोलीस ठाण्याचे आजुबाजुस नेमुन दिल्याप्रमाणे सापळा लावुन थांबले . आमचे पाठोपाठ काहीवेळाने तक्रारदार व पंच क्र.1 हे तक्रारदार यांचेकडील चारचाकी वाहनाने येवून बारामती तालुका पोलीस ठाण्याचे पार्कींगमधे त्यांची चारचाकी वाहन पार्क करुन तिचे आतमधे बसुन राहीले. काहीवेळाने त्यांच्या कारजवळ एक गुलाबी शर्ट घातलेला इसम आला. त्यावेळी तक्रारदार व पंच क्रं. 1 हे वाहनातुन उतरुन त्यांच्याशी बोलले. सदर इसम हा पोलीस ठाण्याबाहेर थांबलेल्या सफेद रंगाच्या नेक्सॉन कारमधे बसुन माळेगांव रोडच्या दिशेने निघाला. यानंतर तक्रारदार पुन्हा त्यांच्या कारमधे बसुन सफेद रंगाच्या नेक्सॉनच्या मागेमाग जावु लागले . सदर वेळी पंच क्रं. 1 यांनी पंच क्रं. 2 यांना गुलाबी रंगाचा शर्ट घातलेला इसम लोकसेवक उगले असल्याचे मोबाईल द्वारे कळवुन त्याने त्याच्या मागे मागे येण्यास सांगीतल्याचे कळविल्याने आंम्ही सर्व सापळा पथकास लागलीच कोणास संशय येणार नाही अश्या पद्धतीने आपापले ताब्यातील वाहनांव्दारे तक्रारदार यांचे वाहनाचा पाठलाग करीत माळेगावरोडवरील पीडीसीसी बँकजवळ येथे पोहोचुन तेथे वेस्ट्रन होसी जॅकी या दुकानासमोर तक्रारदाराने आपली कार थांबवल्यावर आंम्ही व सापळा पथक मोटारसायकल व शासकीय वाहनाने जावुन थांबलो. सदर ठिकाणी पुन्हा आंम्ही सर्वजण उतरुन कोणास संशय येणार नाही अश्या पद्धतीने समयसुचकतेप्रमाणे सापळा लावुन थांबलो. काहीवेळाने तक्रारदार यांच्या हुंडाई कार नंबर एमएच 42 बी जे 2850 जवळ एक गुलाबी रंगाचा शर्ट घातलेला व काही वेळापुर्वी बारामती तालुका पोलीस ठाण्यात त्यांना भेटुन मागे येण्यास सांगीतलेला इसम त्यांच्या जवळ गेला असता त्यास पाहुन तक्रारदार व पंच हे सदर कारमधुन उतरुन त्यांचेत काहीवेळ चर्चा झाली. यानंतर तक्रारदाराने त्याच्या हुंडाई कार नंबर एमएच 42 बी जे 2850 कारची डिक्की उघडुन त्यातील लाच रक्कम असलेली निळी काळी पट्ट्याची व एका बाजुस भगवा रंग असलेली कापडी टिफीन बॅग पिशवी सदर इसमाच्या हातात देवुन आपल्या शर्टाच्या खिशातील रेबॅन गॉगल काढुन डोळ्यावर लावुन लाच स्विकारणीचा नियोजित इशारा केला असता आंम्ही सर्व सापळा पथक तात्काळ सदर ठिकाणी पोहोचलो असता पंच क्रं. 1 यांनी सदर इसम पोलीस महेश उगले असल्याचे सांगुन यांनीच लाच रक्कम स्विकारल्याचे सांगीतले.
त्यानंतर पोशि तावरे यांनी सदर इसमाचे दोन्ही हात त्याचे मनगटाजवळ घटट पकडुन ठेवले . त्यावेळी सदर इसमाने त्याच्या हातातील लाच रक्कम असलेली कापडी खाली जमिनीवर टाकली. तो खुप घाबरलेला होता. आंम्ही त्यांस आमचे ओळखपत्र दाखवुन आमचा व सापळा पथकाचा परीचय देवुन त्यांचे नांव पत्ता विचारता त्यानी आपले नांव महेश अंकुश उगले , वय 36 वर्षे, पोहवा 2637, नेमणुक बारामती तालुका पोलीस ठाणे, पुणे ग्रामीण रा.फ्लॅट नं. 4, विमलनाथ अपा. सुतारचाळ, बारामती असे असल्याचे सांगीतले. त्यावेळी पोशि कुमकर यांनी तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढून तो बंद केला. ती वेळ 15.02 वाजताची होती. यानंतर पोशि कुमकर यांनी शासकिय वाहनातुन व्हिडीओ कॅमेरा काढुन पोशि तावरे यांचेकडे देवुन लोकसेवक उगले यांचे दोन्ही हात पकडले. त्यावेळी तक्रारदार भोईटे यांना बाजुला लांब थांबण्यास सांगीतले. त्यानंतर पोशि तावरे यांनी त्यांचेकडील व्हिडीओ रेकॉर्डरद्वारे व्हिडीओ शुटींग चालू केले. यानंतर लोकसेवक उगले यांना आंम्ही होत असलेल्या कारवाई बाबत त्यांना विश्वासात घेवुन माहिती दिली. लोकसेवक उगले यांना आम्ही काळ्या कपड्याने कृत्रिम अंधार करुन अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे प्रकाशामध्ये दोन्ही पंच, सापळा पथक व माझे हाताची तपासणी करून दाखविली असता कोणाच्याही हाताला अँथ्रासिन पावडरची फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसून आली नाही. लोकसेवक उगले



Scanned with CamScanner

यांना लाच रकमेबाबत विचारणा केली असता त्यांनी जमिनीवर ठेवलेली पिशवीकडे बोट दाखवले. सदर पिशवी त्यांना उघडुन दाखवण्यास सांगीतले असता त्यांनी नकार दिल्याने आमचे सुचनेवरून पंच क्र.1 यांनी सदर पिशवीची चैन उघडून त्यामध्ये लाच रक्कमेचा वर्तमान पत्राने व रबराने पॅक केलेला बंडल काढून समक्ष हजर केला. त्यात 500 रुपये दराचे 200 ख-या नोटा व 500 दराच्या 600 खेळण्यातील नोटा अशी लाच रक्कम दिसुन आली. तसेच सदर लाचेच्या नोटांची अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात काळ्या कपड्याखाली कृत्रीम अंधारात तपासणी केली असता त्यावर फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसुन आली. त्यानंतर लोकसेवक उगले यांची दोन्ही पंचासमक्ष अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे प्रकाशामध्ये काळ्या कपड्याने कृत्रीम अंधार करुन तपासणी केली असता त्यांचे उजवे हाताचे तळ हात व सर्व बोटांचे पेऱ्यांना अँथ्रासिन पावडरची फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसून आली. त्यानंतर आलोसे उगले यांचेकडून हस्तगत केलेल्या रकमेतील खऱ्या नोटांचे व पंच क्रं. 2 कडे नोट नंबर लिहीलेल्या कागदा वरिल नोट नंबरची पंच क्र.1 व 2 यांचे मदतीने शासकीय वाहनात बसुन तपासणी केली असता सर्व नंबर तंतोतंत जुळून आले. त्यानंतर मी तक्रारदार यांना बोलावून काळ्या कपड्याने कृत्रीम अंधार करुन लोकसेवक उगले यांचे समक्ष कृत्रिम अंधारामध्ये अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे प्रकाशामध्ये तक्रारदार यांचे हाताची तपासणी केली असता त्यांचे उजव्या हाताचे तळ हात व सर्व बोटाचे पेऱ्यांना अँथ्रासिन पावडरची फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसून आली.

सदर कारवाई वेळी गर्दीचे ठिकाण असल्याने अडथळा होत असल्यामुळे सदर ठिकाणच्या चर्तु:सिमा घेवून लोकसेवक उगले यांना पुढील कारवाईकामी बारामती शहर पोलीस ठाणे येथे 15.20 वा. घेवून आलो. त्यानंतर मी पंच क्र.1 यांना सापळा कारवाई दरम्यान घडलेल्या हकिकतेबाबत विचारणा केली असता पंच क्र. 1 यांनी सांगितले की, मी व तक्रारदार असे सापळा कारवाईकरीता तक्रारदार यांचे चारकचाकी वाहनाने रवाना होवुन बारामती तालुका पोलीस ठाणे येथे पोहोचुन सुमारे 13.29 वाजता लोकसेवक यांना आंम्ही आलो असल्याबाबत व्हॉअसप कॉल केला असता त्यांनी थोड्याच वेळात येतो असे सांगीतले. यानंतर बराच वेळ झाला ते आले नाही म्हणुन पुन्हा त्यांना दोन तिन वेळा व्हॉटसप कॉल केला असता त्यांनी फायरींग झालेय तिथे आहे असे सांगुन काही वेळाने ते पोलीस ठाण्यात आम्ही थांबलो होतो तेथे आले. आम्ही त्यांना कारमधुन उतरुन भेटलो असता त्यांनी "झाला का विषय" "द्या की मग, चला माझ्या माग मागं आपण पुढं भेटु...माझ्या मागं घ्या की गाडी या की मागं" असे म्हणुन पीडीसीसी बँकपर्यंत यायला लावले. तिथे बराच वेळ वाट पाहुन देखील ते न आल्याने त्यांना पुन्हा तक्रारदार यांनी कॉल केला असता ते आमच्या गाडीजवळ आले असता त्यांना पाहुन मी व तक्रारदार असे तक्रारदाराच्या वाहनातुन खाली उतरल्यावर तक्रारदारासोबत कामाबाबत बोलणे झाल्यावर "द्या की, घ्या की पैसे" असे म्हणुन लाच रकमेची मागणी केली. यांनतर तक्रारदार यांनी स्वताच्या कारची डिक्की उघडुन त्यातुन लाच रक्कम असलेली पिशवी काढुन श्री. उगले यांच्या समोर धरली असता "तसे राहु द्या पिशवीच द्या तशीच, पिशवीच द्या" "पुर्णयेत ना" असे सांगीतले त्यावर तक्रारदाराने "मोजायचे" "हा पाचे" असे सांगीतले असता ठिक आहे असे म्हणुन त्यांनी लाच रक्कम स्विकारली असता तक्रारदाराने डोळ्यांवर गॉगल लावुन लाच रक्कम स्वीकारलेबाबत पुर्वनियोजीत इशारा केला असता सापळा पथक व आपण येवून वरिलप्रमाणे पुढील कारवाई केल्याचे पंच क्र.1 यांनी सांगितले. त्यानंतर तक्रारदार भोईटे यांना सापळा कारवाई दरम्यान घडलेल्या हकिकतेबाबत विचारणा केली असता त्यांनी तक्रारदार यांचेप्रमाणे मिळती जुळती हकिकत सांगितली. त्याबाबत मी दोन्ही पंचासमक्ष व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरीकार्डमध्ये सापळा कारवाईदरम्यान झालेल्या संभाषणाची ध्वनिमुद्रीत फाईल रिव्हर्स फॉरवर्ड करुन ऐकून खात्री केली. वरिल सर्व घटनेचा सविस्तर पडताळणी, सापळापुर्व व सापळा पंचनामा करण्यात आलेला आहे.

तरी दि.07/09/2026 रोजी 18.43 ते 22.05 वा. लाच मागणी पडताळणी दरम्यान बारामती तालुका पोलीस ठाणे येथील आलोसे पोहवा/2637 महेश अंकुश उगले यांनी बारामती तालुका पोलीस ठाणेचे आवारात तसेच फोन कॉलवर तक्रारदार श्री. मनोज भोईटे यांना ते व त्यांची पत्नी वृशाली मनोज भोईटे यांचे विरोधात समस्त ग्रामस्थ नक्षत्र गार्डन, जळोची येथील नागरीकांनी त्यांचे आध्या झुंबा व डान्स क्लासमध्ये विचित्र गाणी लावून विचीत्र डान्स सुरु असतात त्यामुळे नागरिकांना त्रास होत आहे. त्यामुळे त्यांच्या डान्स क्लासेसवरती कारवाई करावी अश्या आशयाच्या त्यांच्याकडील चौकशीकरीता प्राप्त अर्जात कारवाई झाल्यावरती त्यांची बदनामी होवुन मानसिक त्रास होवू शकतो अशी भीती घालुन सदर अर्जात तक्रारदार मनोज भोईटे व त्यांची पत्नी वृशाली यांच्यावर कारवाई न करण्यासाठी 7,00,000/- रुपये लाचेची मागणी करुन पुर्वी 2,00,000/- रुपये लाच स्विकारुन उर्वरीत 5,00,000/- रुपयांची मागणी करुन दिनांक 08/09/2026 रोजी सापळा कारवाई दरम्यान 5,00,000/- रुपये लाच रक्कम स्विकारतांना 15.02 वा. त्यांना बारामती माळेगाव रोड लगत, डेंगळे भारत पेट्रोलपंपाचे डाव्याबाजूस, पीडीसीसी बँकेजवळ, वेस्टर्न होशिजाकी डीप फ्रिज विक्री दुकानाचे समोर येथे रंगेहात पकडण्यात आले. म्हणून माझी त्यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988चे कलम 7 नुसार कायदेशीर फिर्याद आहे.



Scanned with CamScanner

माझा वरिलप्रमाणे संगणकावर मराठीत टंकलिखीत केलेला जबाब हा माझेसांगणेप्रमाणे बरोबर व खरा आहे.
समक्ष                                        हा फिर्यादी जबाब दिला...

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

shirshail chiwadchetti(I (Inspector)) /                **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद):                **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)



Scanned with CamScanner

पोलीस ठाणे अंमलदार
बारामती शहर पोलीस स्टेशन

**Registered by** (नोंदणी अधिकारी)

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): shirshail chiwadchet
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):



Scanned with CamScanner

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**



Scanned with CamScanner